म. ग्रं. सं. ठाणें
य काव्य
नं. ९३९९
९८५५



# मुलांमुलींचा सांस्कृतिक दिनपाठ



संपादक : घोरपडे, मोंधळेकर



REFBK-0008722
REFBK-0008722

मुलांमुलींचा

# सांस्कृतिक दिनपाठ

सुधारून वाढविलेली आवृत्ति

८७२२

अनुक्रम

विभाग

क्रमांक

नों. दि.

संपादक

रा. शं. घोरपडे

वि. न. गोंधळेकर

REFBK-0008722

REFBK-0008722

मूल्य सहा आणे

व्हीनस प्रकाशन : पुणें २

आवृत्ति पहिली : १९५१
आवृत्ति दुसरी : १९५५

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनवार : पुणें २

मुद्रक :
दामोदर त्र्यंबक जोशी
बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव : पुणें २

## स्वतंत्र भारतांतील मुलांमुलींनो,

भारतीय संस्कृतीची, म्हणजे भारतांतील देवदेवता, ऋषिमुनि, साधुसंत, राष्ट्रपुरुष, अवतारी पुरुष यांनीं गद्यपद्यांत, जगांतील सर्व लोकांचें कल्याण व्हावें म्हणून, जो उपदेश केला व जें वाङ्मय लिहिलें, त्याची तुम्हांस थोडीफार तोंडओळख होऊन त्यांच्या उत्कृष्ट वाङ्मयाचें तुमचेकडून पाठांतर व्हावें हाच हेतु हें पुस्तक लिहिण्याचा आहे.

या पुस्तकाच्या पाठांतरानें तुमचे पुढीलप्रमाणें फायदे होतील :

(१) तुमची वाणी स्वच्छ, शुद्ध व स्पष्ट होईल.

(२) मोठेपणीं तुम्हांस कराव्या लागणाऱ्या अवघड उताऱ्यांचें पाठांतर करण्याची आतांपासून तुम्हांस संवय होईल.

(३) वक्तृत्वकलेकरितां पाठांतरांची फारच जरूरी असते; त्याकरितां थोर लोकांचीं सुभाषितें, बोधवचनें, श्लोक इत्यादि पाठ असावे लागतात; त्यास ह्या पाठांतराची फार मदत होईल.

(४) देवादिकांच्या उत्सवप्रसंगीं तुमचीं स्तोत्रें, आरत्या, प्रार्थना वगैरे पाठ असल्यास तुम्हांस आनंद होईल, शाबासकीहि मिळेल.

(५) या पुस्तकांतील वेंच्यांच्या अर्थाकडे तुमचें वयोमानाप्रमाणें जसजसें लक्ष जात जाईल तसतसे त्यांतील सुविचार व भाषेचें सौंदर्य तुम्हांस प्रतीत होऊन तुम्ही सद्वर्तनी, परोपकारी, विद्याव्यासंगी व विद्वान् व्हाल.

जगांतील थोर पुरुषांच्या—मग ते धार्मिक, राजकीय अगर सामाजिक पुढारी असोत, ज्ञानेश्वर—तुकाराम—रामदासांसारखे संत असोत, टिळक—गांधी—नेहरूंसारखे राजकीय पुढारी असोत, कर्वे—गोखले—फुले यांसारखे समाज—सुधारक असोत अगर रामतीर्थ विवेकानंदासारखे तत्त्वज्ञ असोत त्यांच्या थोरवीकडे पाहिल्यास त्यांच्या थोरवीचें बीज त्यांनीं केलेल्या लहानपणच्या पाठांतरांतच आहे असें तुम्हांस आढळून येईल. आतां, पूर्वीं हें काम घरीं आई, आजी, आजोबा, पाठशाळेंत तेथील गुरुजी व शाळेंत शिक्षक करून घेत असत; परंतु आतां शिक्षणपद्धति बदलल्या-मुळें हें काम पुस्तकरूपानें करावें लागत आहे. सध्यां तुमचें वय लहान असल्यामुळें तुम्हीं वेगवेगळ्या पुस्तकांतील सोपें पण महत्त्वाचें पाठांतर केलें पाहिजे. त्याकरितां आतांपर्यंत तुम्हांस वेगवेगळीं पुस्तकें उदा० मारुतीस्तोत्र, रामरक्षा, गीता, आरत्यांचें पुस्तक इत्यादि पुस्तकें आणणें भाग पडत होतें; व त्याकरितां खर्चहि फार लागावयाचा. आतां केवळ ६ आण्यांत तुम्हांस पाठांतरास योग्य असें वाङ्मय एकत्र मिळेल, तर घ्या हें पुस्तक, दाखवा आपल्या पालकांना आणि करा पाठांतराला सुरुवात!

—तुमचे शुभेच्छु संपादक—

**घोरपडे-गोंधळेकर**

# माननीयांचे अभिप्राय

आमचे मित्र श्री. रा. शं. घोरपडे व श्री. वि. न. गोंधळेकर यांनीं 'मुलांमुलींचा सांस्कृतिक दिनपाठ' या एका अत्यंत उपयुक्त पुस्तिकेचें संपादन केलें आहे. अलीकडे शिक्षणक्रमांतून पाठांतराचें उच्चाटन होत आहे व त्यामुळें आपल्या विद्यार्थ्यांची फारच हानि होत आहे. त्या दृष्टीनें या पुस्तिकेचें महत्त्व लक्षांत घ्यावयास पाहिजे. ज्याची त्याची धार्मिक प्रवृत्ति निरनिराळी असते. संपूर्णतया अधार्मिक मनुष्य असूंच शकत नाहीं. 'मी पूर्ण निधर्मी आहें' असें अट्टाहासानें सांगणें हें केवढें धार्मिक कृत्य आहे! आमच्या धर्मातील "समं सर्वेषु भूतेषु न मे द्वेष्यो न च प्रियः" ही मोठी शिकवण यांतून मिळत नाहीं काय? श्री. गोंधळेकर–घोरपडे यांनीं विद्यार्थ्यांनीं मुखोद्गत करावे असे अनेक वेंचे या पुस्तिकेंत घातले आहेत. याची गोडी लागली म्हणजे विद्यार्थ्यांना सहजच यांसारख्या इतर अनेक गोष्टींबद्दल औत्सुक्य व जिज्ञासा उत्पन्न होईल. श्रीसमर्थांनीं ज्या अनेक गुरूंची दासबोधांत महती सांगितली आहे त्यांत एक 'दीक्षागुरु' आहे. आम्हांला वाटतें या पुस्तिकेच्या संपादकांनीं 'दीक्षागुरू' चें काम फार उत्कृष्टपणें केलें आहे. वास्तविक या संग्रहांत किती तरी गोष्टी अद्यापि घालण्यासारख्या आहेत. परंतु तसें केल्यानें पहिलाच घुटका मोठा होईल व विद्यार्थ्यांना मौज वाटणार नाहीं, म्हणून मुद्दाम अगदीं थोडक्यांत सर्व सद्भावनांची दीक्षा देण्याचा हा प्रयत्न आहे. इतकी सुंदर पुस्तिका तयार केल्याबद्दल आम्ही सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या तर्फें या दोन दीक्षितांचे मनःपूर्वक आभार मानतों.

**वा. मा. दबडघाव**
मुख्याध्यापक
नू. म. वि. इं. शाळा, पुणें २

**पु. रा. वझे**
मुख्य पर्यवेक्षक
नू. म. वि. इं. शाळा, पुणें २

## महामहोपाध्यायांचा आशीर्वाद

या पुस्तकांत दिलेलीं स्तोत्रें, श्लोक, आरत्या, भूपाळ्या माझ्या बालपणीं सर्वांना तोंडपाठ येत; कारण त्या घरोघर थोरहि म्हणत व मुलांबाळांकडून पाठ करून घेत. जुन्यांच्या जोडीला चार दोन आधुनिक कवनांचीहि भर निवडणाऱ्यांनीं घातली आहे.

**पाठान्तर अवश्य पाहिजे**

बालपणीं श्रद्धाहि असते. तथापि आमचें भांडार एवढें मोठें आहे कीं युगमानास धरून जुन्यांतूनहि कितीतरी नवें सरस काढून अशीं छोटीं पुस्तकें रचितां येतील. मात्र छपाई अगदीं शुद्ध केली पाहिजे. तेव्हां असे आणखी संग्रह पण दृष्टि निराळी ठेवून काढावे.

**या पुस्तकाचा मुलांमुलींनीं अवश्य उपयोग करावा.**

लोककल्याण,
भाद्रपद शु॥ ८
२९।८।५२ पुणें,

दत्तो वामन पोतदार
महामहोपाध्याय

## प्रकाशकाचें निवेदन :

मुंबई इलाख्याच्या माध्यमिक शाळांतून हल्लीं मुंबई सरकारनें 'सोशल' व 'कल्चरल' स्टडीज् म्हणजे सामाजिक व सांस्कृतिक शिक्षणाकरितां आठवड्यांतून ३ तास ठेविले आहेत. भारतांतील जुनी संस्कृति फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. अशा भारतीय संस्कृतीचा अभ्यास होणें अत्यंत आवश्यक आहे. त्याकरितां या पुस्तकांतील अभ्यास व पाठांतर होणें आवश्यक आहे. मुंबई इलाख्यांतील अनेक शाळांनीं हें पुस्तक प्राथमिक व माध्यमिक शाळांतून पाठांतराकरितां नेमलें, त्याचा परिणाम मुलांच्या संस्कृतीवर उत्तम तऱ्हेनें दिसून आला. तरी सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना विनंती कीं, त्यांनीं इयत्ता १ ते ७ मधील मुलांमुलींना हें पुस्तक नेमावें व तें विकत घेण्यासंबंधीं त्यांना शिफारस करावी.

—प्रकाशक

# मुलांमुलींचा सांस्कृतिक दिनपाठ

संपादक : **घोरपडे-गोंधळेकर**

## पहांटे उठल्याबरोबर म्हणावयाचा श्लोक

कराग्रे वसते लक्ष्मीः ।
करमध्ये सरस्वती ॥
करमूले तु गोविंदः ।
प्रभाते करदर्शनम् ॥ १ ॥

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम १०२५८
विभाग ३१०४
क्रमांक ७३७९
नों. दि. ३।१२।५४
वाचनालय शाखा

# भूपाळ्या

## १. भूपाळी : गणपतीची



उठा उठा हो सकळिक । वाचें स्मरावा गजमुख ।
ऋद्धिसिद्धींचा नायक । सुखदायक भक्तांसी ।
सुखदायक दासांसी ॥ ध्रु० ॥

अंगीं शेंदुराची उटी । माथां शोभतसे कीरिटी ।
केशर कस्तूरी ल्लाटीं । हार कंठीं साजिरा ॥ १ ॥

कानीं कुंडलांची प्रभा । चंद्रसूर्य जैसे नभा ॥
माजी नागबंदी शोभा । स्मरतां उभा जवळी तो ॥ २ ॥

कांसे पीतांबराची धटी । हातीं मोदकांची वाटी ॥
रामानंद स्मरतां कंठीं । तो संकटीं पावतो ॥ ३ ॥

### प्रातःस्मरणम्

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥ १ ॥
गणनाथसरस्वतीरविशुक्रबृहस्पतीन् ।
पञ्चैतान्संस्मरेन्नित्यं वेदवाणीप्रवृत्तये ॥ २ ॥
विनायकं गुरुं भानुं ब्रह्माविष्णुमहेश्वरान् ।
सरस्वतीं प्रणम्यादौ सर्वकार्यार्थसिद्धये ॥ ३ ॥
अभीप्सितार्थसिद्ध्यर्थं पूजितो यः सुरासुरैः ।
सर्वविघ्नहरस्तस्मै गणाधिपतये नमः ॥ ४ ॥

## २. भूपाळी : श्रीरामाची

उठोनिया प्रातःकाळीं । जपा रामनामावळी ।
स्वयें ध्यातो चंद्रमौळी । शैलबाळीसमवेत ॥ ध्रु० ॥
राम योग्यांचें मंडन । राम भक्तांचें भूषण ।
राम धर्माचें रक्षण । संरक्षण दासांचें ॥ १ ॥
रामें ताटका मारिली । रामें शिळा उद्धरिली ।
रामें जानकी पर्णिली । गणिका केली तैं मुक्त ॥ २ ॥
रामें पाषाण तारिले । रामें दैत्य संहारिले ।
रामें बंदी सोडविले । मुक्त केले सुरवर ॥ ३ ॥
रामें रक्षिलें भक्तांसी । रामें सोडविलें देवांसी ।
राम दासांचे मानसीं । रामदासीं आनंद ॥ ४ ॥

---

### मंगलाचरणम्

कौसल्या सुप्रभा राम पूर्वा संध्या प्रवर्तते ।
उत्तिष्ठ नरशार्दूल कर्तव्यं दैवमाह्निकम् ॥ १ ॥

उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविंद उत्तिष्ठ गरुडध्वज ।
उत्तिष्ठ कमलाकान्त त्रैलोक्यं मंगलं कुरु ॥ २ ॥
नमो ब्रह्मण्यदेवाय गोब्राह्मणहिताय च ।
जगद्धिताय कृष्णाय गोविंदाय नमो नमः ॥ ३ ॥
कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने ।
प्रणतक्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः ॥ ४ ॥
वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥ ५ ॥
मङ्गलं भगवान् विष्णुर्मङ्गलं गरुडध्वजः ।
मङ्गलं पुण्डरीकाक्षो मङ्गलायतनं हरिः ॥ ६ ॥
श्रीरामा पुरुषोत्तमा नरहरे नारायणा केशवा
गोविंदा गरुडध्वजा गुणानिधे दामोदरा माधवा ।
श्रीकृष्णा कमलापते यदुपते सीतापते श्रीपते
वैकुंठाधिपते चराचरपते लक्ष्मीपते पाहि माम् ॥ ७ ॥

---

## ३. भूपाळी : श्रीकृष्णाची

ऊठिं गोपालजी जाइं धेनूकडे । पाहती सौंगडे वाट तूझी ॥ ध्रु० ॥
लोपली हे निशी मंद झाला शशी। मुनिजन मानसीं ध्याति तुजला ॥१॥
भानु-उदयाचळीं तेज पुंजाळलें । विकसती कमळें जळामाजीं ॥ २ ॥
धेनुवत्सें तुला बाहती माधवा । ऊठ गा यादवा उशिर झाला ॥ ३ ॥
ऊठ पुरुषोत्तमा ! वाट पाहे रमा । दावि मुखचंद्रमा सकळिकांसी ॥ ४ ॥
कनक पात्रांतरीं दीपरत्नें बरीं । ओवाळिती सुंदरी तूजलागीं ॥ ५ ॥
जन्मजन्मांतरीं दास होऊं हरी । बोलती वैखरी भक्त तूझे ॥ ६ ॥
कृष्णकेशव करीं चरणांबुज धरी । ऊठ गा श्रीहरी मायबापा ॥ ७ ॥

---

# ४. भूपाळी : घनश्याम श्रीधराची



घनःश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला ।
उठिं लवकरि वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ ध्रु० ॥
सायंकाळीं एके मेळीं द्विजगण अवघे वृक्षीं ।
अरुणोदय होतांचि उडाले चरावया पक्षी ॥
अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरण दक्षी ।
प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी ॥
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं ।
यमुनाजळासी जाति मुकुंदा दध्योदन भक्षीं ॥
मुखप्रक्षाळण करीं अंगिकारी भाकर--काला ।
उठिं लवकरि वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ १ ॥
घरोघरीं दिप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती ।
गीत गाती सप्रेमें गोपी सदना येति जाती ॥
प्रवर्तोनि गृहकामीं रंगावळि घालूं पाहती ।
आनंदकंदा ! प्रभात झाली ऊठ सरलि राती ॥
काढि धार क्षिर-पात्र घेउनी धेनू हंबरती !
द्वारिं उभे गोपाळ हाक मारुनि तुजला वाहती ॥
लक्षिताति वासुरें हरि धेनुस्तनपानाला ।
उठिं लवकरि वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ २ ॥
प्रातःस्नानें करुनि गोपिका अलंकारें नटती ।
कुंकुमादि चर्चुनी मंथनालागीं आरंभिती ॥

प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावळि गाती।
अर्घ्यदान देउनियां द्विजगण देवार्चन करिती ॥
नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णु-पूजा समर्पिती।
स्मार्त शिवार्चन-सक्त शक्ति ते शाक्तहि आराधिती ॥
एवढा वेळ निजलासि म्हणून हरि समजेल नंदाला।
उठिं लवकरि वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ ३ ॥
विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं।
अध्यापन गुरु करिती शिष्यहि अध्ययना उदयीं ॥
याज्ञिकजन कुंडामधिं आहुति टाकितात पाहीं।
रविप्रभा पडुनियां उजळल्या शुद्ध दिशा दाही ॥
हे माझे पाडसे सांवळे उठिं कृष्णाबाई।
सिद्ध सवें बळिराम घेउनि गो-धनें वना जाई ॥
कोटि रवींहुनि तेज आगळें तुझिया वदनाला।
होनाजी बाळा नित्य ध्यातसे, हृदयिं नाममाळा ॥
घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला।
उठिं लवकरि वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ ४ ॥

---

## ५. भूपाळी : सरस्वतीची



नमनें वाहुनि स्तवनें उधळा। जयजयकार करा।
बंधुहो। जयजयकार करा।
सकल मनांचा विकास येतो आज
आपुल्या घरा ॥ ध्रु० ॥
विमलहास्य सुमवृष्टीमध्यें असो तुझें स्वागत।
निरंतर। असो तुझें स्वागत।
परमात्म्याच्या चित्सौंदर्या येईं बा हांसत ॥ १ ॥

आत्मवेलिच्या स्फूर्तिफुलांवर वसंत जे विकसती ।
बुद्धिचे वसंत जे विकसती ।
त्याच वसंता, तदिय विकासा, सरस्वती बोलती ॥२॥

विश्वकाव्य वाचीत बैसली चित्तमयूरावरी ।
दीप्ति जी चित्तमयूरावरी ।
त्या दीप्तीला, त्या ज्ञप्तीला, वदती वागीश्वरी ॥ ३ ॥

हे वाग्देवी, असे प्रार्थना ये या संकीर्तना ।
उत्सवा । ये या संकीर्तना ।
जगन्मंगले सकल मंगलांसह दे पददर्शना ॥ ४ ॥

सगुणशांत त्वच्चित्रमूर्तिला । गातों मी गायन ।
शारदे गातों मी गायन ।
धन्य धन्य सौंदर्य, धन्य त्वत्प्रसन्न पुण्यानन ॥ ५ ॥

किरिट शोभला त्वन्मौलीला अमूल्य तत्त्वांचा ।
शारदे । अमूल्य तत्त्वांचा ।
अरुणराग त्यांतून उधळला । सद्गुण रत्नांचा ॥ ६ ॥

डोले कंठीं सच्छास्त्रांचा चंद्रहार हांसरा ।
पाहुनी । चंद्रहार हांसरा ।
भालीं फुलला, गालीं खुलला, काव्यदिव्य बिजवरा ॥ ७ ॥

सौंदर्याहुनि दिव्य दिव्यतर हिचें ज्ञान सुंदर ।
खरोखर । हिचें ज्ञान सुंदर ।
त्या ज्ञानाहुन जगांत सुंदर एकच परमेश्वर ॥ ८ ॥

हृदयमंदिरीं प्राणशक्तिचे झोपाळे डोलवी ।
देवि ही झोपाळे डोलवी ।
सुखदुःखाचे देउनि झोके जीवांना खेळवी ॥ ९ ॥

विचार-कारंजावर तुषार शब्दांचे नाचवी।
देवि ही शब्दांचे नाचवी।
जीवात्मा त्यांतून बोलवी परमात्मा डोलवी ॥ १० ॥
चराचराचा दावि चित्रपट। असुच्या स्मरणावर।
भराभर असुच्यां स्मरणावर।
विजेऐवजीं त्यांत जळे चिच्चंद्राचें झुंबर ॥ ११ ॥

## ६. नमन



यं ब्रह्मा वरुणेन्द्ररुद्रमरुतस्तुन्वन्ति दिव्यैः स्तवैः।
वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ॥
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो।
यस्यान्तं न विदुः सुराः सुरगणा देवाय तस्मै नमः ॥१॥
या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता।
या वीणावरदण्डमाण्डितकरा या श्वेतपद्मासना ॥
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥२॥

शांताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं।
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्ण शुभांगं ॥
लक्ष्मीकांतं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं।
वंदे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथं ॥ ३ ॥

महायोगपीठे तटे भीमरथ्याम्
वरं पुण्डलीकाय दातुं मुनीन्द्रैः।
समागत्य तिष्ठन्तमानन्दकन्दं
परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरङ्गम् ॥ ४ ॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ५ ॥

अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र
तिथें नांदतो ज्ञानराजा सुपात्र ।
तया आठवीतां महा पुण्यराशी
नमस्कार माझा सद्‌गुरु ज्ञानेश्वरासी ॥ ६ ॥

शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें ।
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें ॥
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा ।
नमस्कार माझा सद्‌गुरू रामदासा ॥ ७ ॥

---

## ७. स्तवन



मनोजवं मारुततुल्यवेगं । जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ॥
वातात्मजं वानरयूथमुख्यं । श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥१॥
नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी ।
हरी जो तापातें उसळुनि कृपा-सिंधु-लहरी ॥
हरी वाटे काळा करिस विपती मृत्युभुजगा ।
जगाचा तूं ऐसा धनि कवण तो पाव मजगा ॥ २ ॥
मजला अनाथा प्रभु तूंच दाता । मी मूढ कीं जाण असेंच आतां ॥
दासा मनीं आठव वीसरेना । तुजवीण रामा मज कंठवेना ॥ ३ ॥

शास्त्राभ्यास नको श्रुती पढुं नको तीर्थासि जाऊं नको ।
योग्याभ्यास नको व्रतें मख नको तीव्रें तपें तीं नको ।

काळाचें भय मानसीं धरुं नको दुष्टांस शंकूं नको।
ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडूं नको ॥ ४ ॥

मालाकमण्डलुरधः करपद्मयुग्मे । मध्यस्थपाणियुगले डमरुत्रिशूले ।
यस्यस्त ऊर्ध्वकरयोः शुभशङ्खचक्रे। वन्दे तमत्रिवरदं भुजषट्कयुक्तम्॥५॥

ध्यायेन्नित्यं महेशं रजतगिरिनिभं चारुचन्द्रावतंसम्।
रत्नाकल्पोज्ज्वलाङ्गं परशुमृगवरा भीतिहस्तं प्रसन्नम् ॥
पद्मासीनं समन्तात् स्तुतममरगणैर्व्याघ्रकृत्तिं वसानम्।
विश्वाद्यं विश्ववन्द्यं निखिलभयहरं पञ्चवक्त्रं त्रिनेत्रम् ॥ ६ ॥

वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटिसमप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥ ७ ॥

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः।
नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम् ॥ ८ ॥

ध्येयः सदा सवितृमण्डलमध्यवर्ती।
नारायणः सरसिजासनसंनिविष्टः ॥
केयूरवान् मकरकुण्डलवान् किरीटी।
हारी हिरण्मयवपुर्धृतशङ्खचक्रः ॥ ९ ॥

---

## ८. स्तोत्रें

### । संकष्टनाशनस्तोत्रम् ।



प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम्।
भक्त्या व्यासं स्मरेन्नित्यमायुष्कामार्थ सिद्धये।
प्रथमं वक्रतुण्डं च एकदन्तं द्वितीयकम्।
तृतीयं कृष्णपिङ्गाक्षं गजवक्त्रं चतुर्थकम् ॥ १ ॥

लम्बोदरं पञ्चमं च षष्ठं विकटमेव च ।
सप्तमं विघ्नराजेन्द्रं धूम्रवर्णं तथाष्टमम् ।
नवमं भालचन्द्रं च दशमं तु विनायकम् ।
एकादशं गणपतिं द्वादशं तु गजाननम् ॥ २ ॥
द्वादशैतानि नामानि त्रिसंध्यं यः पठेन्नरः ।
न च विघ्नभयं तस्य सर्वसिद्धिकर प्रभो ।
विद्यार्थी लभते विद्यां धनार्थी लभते धनम् ।
पुत्रार्थी लभते पुत्रान्मोक्षार्थी लभते गतिम् ॥ ३ ॥

## । नवनागस्तोत्रम् ।

अनन्तं वासुकिं शेषं पद्मनाभं च कम्बलम् ।
शङ्खपालं धृतराष्ट्रं तक्षकं कालियं तथा ॥ १ ॥
एतानि नव नामानि नागानां च महात्मनाम् ।
सायंकाले पठेन्नित्यं प्रातःकाले विशेषतः ॥
तस्य विषभयं नास्ति सर्वत्र विजयी भवेत् ॥ २ ॥

## । द्वादश ज्योतिर्लिङ्गानि ।



सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकालमोंकारममलेश्वरम् ॥ १ ॥
परल्यां वैजनाथं चं डाकिन्यां भीमशङ्करम् ।
सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥ २ ॥
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे ।
हिमालये तु केदारं घुसृणेशं शिवालये ॥ ३ ॥
एतानि ज्योतिर्लिङ्गानि सायं प्रातः पठेन्नरः ।
सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ॥ ४ ॥

## श्रीशिवस्तुति

कैलासराणा शिवचंद्रमौळी । फणींद्र माथां मुगुटीं झळाळी ॥
कारुण्यसिंधू भवदुःखहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ॥ १ ॥

### । श्रीशनैश्चरस्तोत्रम् ।

कोणस्थः पिङ्गलो बभ्रुः कृष्णो रौद्रोऽन्तको यमः ।
सौरिः शनैश्चरो मन्दः पिप्पलादेन संस्तुतः ॥
एतानि दश नामानि प्रातरुत्थाय यः पठेत् ।
शनैश्चरकृता पीडा न कदाचिद्भविष्यति ॥ १ ॥

### ॥ श्री शनीची प्रार्थना ॥

नमस्ते कोणसंस्थाय पिंगलाय नमोऽस्तु ते ।
नमस्ते बभ्ररूपाय कृष्णाय च नमोऽस्तु ते ॥
नमस्ते रौद्रदेहाय नमस्ते चांतकाय च ।
नमस्ते यमसंज्ञाय नमस्ते सौरये विभो ॥
नमस्ते मंदसंज्ञाय शनैश्चर नमोऽस्तु ते ।
प्रसादं कुरु देवेश दीनस्य प्रणतस्य च ॥

### । श्रीनृसिंहस्तोत्रम् ।

प्रल्हादभक्तवचसा हरिराविरासीत् ।
स्तम्भे हिरण्यकशिपुं य उदारभावः ॥
ऊर्वौ निधाय तदुदरो नखरैर्ददार ।
स त्वं नृसिंह मयि देहि कृपावलोकम् ॥ १ ॥

### । श्रीकृष्णस्तोत्रम् ।

कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने ।
प्रणतः क्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः ॥ १ ॥

---

## ९. स्नान करतांना म्हणावयाचे श्लोक

गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति ।
नर्मदे सिंधु कावेरि जलेऽस्मिन् संनिधिं कुरु ॥ १ ॥

नमामि गंगे तव पादपंकजं सुरासुरैर्वन्दितदिव्यरूपाम् ।
भुक्तिं च मुक्तिं च ददासि नित्यं भवानुसारेण सदा नराणाम् ॥२॥
गंगा गंगेति यो ब्रूयात् योजनानां शतैरपि ।
मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोकं स गच्छति ॥ ३ ॥
गंगाद्वारे कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते ।
स्नात्वा च कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते ॥ ४ ॥
पापोऽहं पापकर्माऽहं पापात्मा पापसंभवः ।
त्राहि मां कृपया गंगे सर्वपापहरा भव ॥ ५ ॥

## १०. श्रीसूर्यनमस्कार



ध्येयः सदा सवितृमंडलमध्यवर्ती ।
नारायणः सरसिजासनसंनिविष्टः ॥
केयूरवान् मकरकुंडलवान् किरीटी ।
हारी हिरण्मयवपुर्धृतशंखचक्रः ॥

सूर्याचीं बारा नांवें:—

| | |
|---|---|
| १ ॐ मित्राय नमः | २ ॐ रवये नमः |
| ३ ॐ सूर्याय नमः | ४ ॐ भानवे नमः |
| ५ ॐ खगाय नमः | ६ ॐ पूष्णे नमः |
| ७ ॐ हिरण्यगर्भाय नमः | ८ ॐ मरीचये नमः |
| ९ ॐ आदित्याय नमः | १० ॐ सवित्रे नमः |
| ११ ॐ अर्काय नमः | १२ ॐ भास्कराय नमः |

ॐ भास्करेभ्यो नित्यं नमो नमः

आदित्यस्य नमस्कारान् ये कुर्वन्ति दिने दिने ।
जन्मांतरसहस्रेषु दारिद्र्यं नोपजायते ॥ १ ॥
अकालमृत्युहरणं सर्वव्याधिविनाशनम् ।
सूर्यपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहम् ॥ २ ॥
शरीरे जर्जरे भूते व्याधिग्रस्ते कलेवरे ।
औषधीन् जान्हवीतोयं वैद्यो नारायणो हरिः ॥ ३ ॥

## ११. भोजनापूर्वी म्हणावयाचा संकल्प

यन्तु नदयो वर्षन्तु पर्जन्याः ।
सुपिप्पला ओषधयो भवन्तु ॥
अन्नवतामोदनवतामामिक्षवताम् ।
एषा ५ राजा भूयासम् ॥
ओदनमुद् ब्रुवते परमेष्ठी वा एषः यदोदनः ।
परमामेवैन ५ श्रियं गमयति ॥

---

## १२. भोजनाचे वेळीं म्हणावयाची प्रार्थना

ॐ स्वस्ति प्रजाभ्यः परिपालयन्तां । न्याय्येन मार्गेण महीं महीशाः ॥
गोब्राह्मणेभ्यः शुभमस्तु नित्यं । लोकाः समस्ताः सुखिनो भवन्तु ॥१॥
सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखमाप्नुयात् ॥ २ ॥
काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी ।
देशोऽयं क्षोभरहितो ब्राह्मणाः सन्तु निर्भयाः ॥ ३ ॥
ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ ४ ॥
हरिर्दाता हरिर्भोक्ता हरिरन्नं प्रजापतिः ।
हरिर्विप्रशरीरस्तु भुंक्ते भोजयते हरिः ॥ ५ ॥
जनीं भोजनीं नाम वाचें वदावें । अती आदरें गद्यघोषें म्हणावें ॥
हरी चिंतनें अन्न सेवीत जावें । तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें ॥ ६ ॥
वदनिं कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचें ।
सहज हवन होतें नाम घेतां फुकाचें ॥

जिवन करि जिवित्वा अन्न हें पूर्ण ब्रह्म ।
उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ॥ ७ ॥
। जय जय श्रीरघुवीर समर्थ, रामदास स्वामी महाराज की जय,
श्रीगुरुदेव दत्त, मंगलमूर्ती मोरया ।

## १३. दीपदर्शनाचे वेळीं म्हणावयाचा श्लोक



शुभं करोतु कल्याणं ।
आरोग्यं धनसंपदा ॥
शत्रुबुद्धिविनाशाय ।
दीपज्योते नमोऽस्तु ते ॥ १ ॥

## १४. रामदासी वेंचे

### कष्टेंवीण फळ नाहीं

कष्टेंवीण फळ नाहीं । कष्टेंवीण राज्य नाहीं ।
केल्यावीण होत नाहीं । साध्य कांहीं ॥ १ ॥
आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें ।
कष्टाकडे चुकाविते । हीन जन ॥ २ ॥
आधीं कष्टाचें दुःख सोसिती । ते पुढें सुखाचें फळ भोगिती ।
आधीं आळसें सुखावती । त्यांपुढें दुःख ॥ ३ ॥
इहलोक अथवा परलोक । दोहींकडे सारिखाचि विवेक ।
दीर्घ सूचनेचें कौतुक । कळलें पाहिजे ॥ ४ ॥
जेहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ।
येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ॥ ५ ॥

## बुद्धि दे रघुनायका

युक्ति नाहीं बुद्धि नाहीं । विद्या नाहीं विवंचिता ।
नेणता भक्त मी तूझा । बुद्धि दे रघुनायका ॥ १ ॥
बोलतां चालतां ये ना । कार्यभाग कळेचिना ।
बहु मी पीडिलों लोकीं । बुद्धि दे रघुनायका ॥ २ ॥
तुझा मी टोणपा झालों । कष्टलों बहुतांपरी ।
सौख्य तों पाहतां नाहीं । बुद्धि दे रघुनायका ॥ ३ ॥
नेटकें लिहितां ये ना । वाचितां चुकतों सदा ।
अर्थ तो सांगतां ये ना । बुद्धि दे रघुनायका ॥ ४ ॥
प्रसंग वेळ तर्के ना । सुचेना दीर्घ सूचना ।
मैत्रिकी राखितां ये ना । बुद्धि दे रघुनायका ॥ ५ ॥

## खरा देव

जनीं लोचनीं पाहतां दीसताहे । तया नाश काळांतरीं होत आहे ।
अवीनाश तो कोण आधीं पहावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥१॥
जगीं धुंडितां धुंडितां आढळेना । कदा सद्‌गुरूवीण ठाईं पडेना ।
सदा सर्वदा तोचि धुंडीत जावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥२॥
जयावीण कोठें रिता ठाव नाहीं । तया शोधितां तोचि होऊनि राहीं ।
म्हणे दास विश्वास भावें धरावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥ ३ ॥

---

# १५. मनाचे श्लोक

समर्थाचिया सेवकां वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ? ॥
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी॥१॥
सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ॥
सुखानंद आनंद कैवल्यदानी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी। ॥ २ ॥

असे हो जया अंतरीं भाव जैसा। वसे हो तया अंतरीं देव तैसा ॥
अनन्यास रक्षीतसे चापपाणी। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ ३ ॥
सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा। उडी घालितो संकटीं स्वामि तैसा ॥
हरी-भक्तिचा घाव घाली निशाणी। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥४॥
दिनानाथ हा राम कोदंडधारी। पुढें देखतां काळ पोटीं थरारी ॥
जनीं वाक्य नेमस्त हें सत्य मानीं। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥५॥
जगीं पाहतां देव हा अन्नदाता। तया लागली तत्त्वतां सारचिंता।
तयाचे मुखीं नाम घेतां फुकाचें। मना सांग पां रे तुझें काय वेंचे ॥६॥
उपासनेला दृढ चालवावें। भूदेव-संतांसि सदा लवावें ॥
सत्कर्मयोगें वय घालवावें। सर्वांमुखीं मंगल बोलवावें ॥ ६ ॥
मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें। तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें ॥
जनीं निंद्य तें सर्व सोडोनि द्यावें। जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ॥ ८ ॥
प्रभातें मनीं राम चिंतीत जावा। पुढें वैखरी राम आधीं वदावा ॥
सदाचार हा थोर सोडूं नये तो। जनीं तोचि तो मानवी धन्य होतो ॥९॥
मना वासना दुष्ट कामा नये रे। मना सर्वथा पापबुद्धी नको रे ॥
मना धर्मता नीति सोडूं नको हो। मना अंतरीं सारवीचार राहो ॥ १० ॥
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें। मना बोलणें नीच सोशीत जावें ॥
स्वयें सर्वदा नम्र वाचें वदावें। मना सर्व लोकांसि रे नीववावें ॥ ११ ॥
देहें त्यागितां कीर्ति मागें उरावी। मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावें। परी अंतरीं सज्जना नीववावें ॥ १२ ॥
मना सर्वथा सत्य सोडूं नको रे। मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे ॥
मना सत्य तें सत्य वाचें वदावें। मना मिथ्य तें मिथ्य सोडून द्यावें ॥१३॥
सदा सर्वदा योग तूझा घडावा। तुझे कारणीं देह माझा पडावा ॥
उपेक्षूं नको गूणवंता अनंता। रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ १४ ॥
अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं। तया पामरा बाधिजे सर्व कांहीं ॥
महाराज तो स्वामि कैवल्यदाता। वृथा वाहणें देह-संसार-चिंता ॥१५॥

## १६. ॥ श्रीतुलसीस्तोत्रम् ॥

जगद्धात्रि नमस्तुभ्यं विष्णोश्च प्रियवल्लभे ।
यतो ब्रह्मादयो देवाः सृष्टिस्थित्यंतकारिणः ॥ १ ॥
नमस्तुलसि कल्याणि नमो विष्णुप्रिये शुभे ।
नमो मोक्षप्रदे देवि नमः संपत्प्रदायिके ॥ २ ॥
तुलसी पातु मां नित्यं सर्वापद्भ्योऽपि सर्वदा ।
कीर्तितापि स्मृता वापि पवित्रयति मानवम् ॥ ३ ॥
नमामि शिरसा देवीं तुलसीं विलसत्तनुम् ।
यां दृष्ट्वा पापिनो मर्त्या मुच्यन्ते सर्वकिल्बिषात् ॥ ४ ॥
तुलस्यां रक्षितं सर्वं जगदेतच्चराचरम् ।
या विनिर्हंति पापानि दृष्ट्वा वा पापिभिर्नरैः ॥ ५ ॥
तुलस्यां सकला देवा वसन्ति सततं यतः ।
अतस्तामर्चयन्लोके सर्वान् देवान् समर्चयन् ॥ ६ ॥

---

## १७. सौभाग्यस्तोत्र

नमो नमो महाकाली महालक्ष्मी सरस्वती ।
सावित्री तुळसी देवी प्रणती ही तुम्हांप्रती ॥ १ ॥
कुटुंबीं आमुच्या सर्वां देईं सद्बुद्धि निर्मळ ।
अखंड मजला अंबे द्यावें सौभाग्य सोज्वळ ॥ २ ॥
अनसूया महासाध्वी लोपामुद्रा पतिव्रता ।
अरुंधतीपरी लाधो ह्या लोकीं मज धन्यता ॥ ३ ॥
गोविप्रातिथिसेवेची आवडी देईं तूं सदा ।
श्रेष्ठांची साधुसंतांची अवज्ञा न घडो कदा ॥ ४ ॥

प्रार्थना करित्यें मी हो मातें द्यावा असा वर ।
चित्तीं रूप तुझें ध्यातें प्रेम देईं निरंतर ॥ ५ ॥
कुटुंबीं आमुच्या सर्वां देईं सुज्ञान निर्मळ ।
अखंड मजला अंबे द्यावें सौभाग्य सोज्वळ ॥ ६ ॥
कुटुंबीं आमुच्या सर्वां दीर्घायु करि निश्चळ ।
अखंड मजला अंबे द्यावें सौभाग्य सोज्वळ ॥ ७ ॥

---

## १८. रामायण–एकश्लोकी

आदौ रामतपोवनादिगमनं हत्वा मृगं कांचनम् ।
वैदेहीहरणं जटायुमरणं सुग्रीवसंभाषणम् ॥
वालीनिर्दलनं समुद्रतरणं लंकापुरीदाहनम् ।
पश्चाद्रावणकुंभकर्णहननं एतद्धि रामायणम् ॥ १ ॥

---

## १९. भागवत–एकश्लोकी

आदौ देवकि–देवि–गर्भ–जननं गोपीगृहे वर्धनम् ।
मायापूतनजीवितापहरणं गोवर्धनोद्धारणम् ॥
कंसच्छेदन–कौरवादि–हननं कुन्तीतनूजावनम् ।
एतद्भागवतं पुराणकथितं श्रीकृष्णलीलामृतम् ॥ १ ॥

---

## २०. देवाची प्रार्थना

क्षणहि तुमची देवा सेवा नसे घडली मला ।
मलिन बहु मी झालों ल्यालों अघांबुधिच्या मला ॥
परि न नरकीं रंका टाका, सदा ममता धरा ।
शरण नर जो आला त्याला तुम्ही प्रभु उद्धरा ॥ १ ॥

सुसंगति सदा घडो; सुजन-वाक्य कानीं पडो ।
कलंक मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो ॥
सदंघ्रिकमळीं दडो, मुरडितां हटानें अडो ।
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो ॥ २ ॥

न निश्चय कधीं ढळो, कुजनविघ्न बाधा टळो ।
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्तमार्गीं वळो ॥
स्वतत्त्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो ।
पुन्हां न मन हें मळो, दुरित आत्मबोधें जळो ॥ ३ ॥

---

## २१. भारता प्राचीना जनपदा

रक्ष रक्ष ईश्वरा भारता । प्राचीना जनपदा ॥
भोगियली बहु जयें एकदां । वैभव सुखसंपदा ॥ धृ० ॥

सगरद्वीपाहुनी सिंधु तो । काश्मीरापासुनी ॥
कृष्णकुमारीकडे शांतिचें । राज्य देईं पसरुनी ॥ १ ॥

प्रेमभाव धरुनियां पुत्र हे । ऐक्य करुत झडकरी ॥
कर्तव्या जागुनी करूं दे । कर्तव्यें हीं खरीं । ॥ २ ॥

शाश्वत सत्य-ज्ञान-दिवाकर । उगवो हृदयांतरीं ॥
धर्मतेज देखुनी चकित हो । देववृंद अंबरीं ॥ ३ ॥

गाढ तमीं बुडतसें राष्ट्र हें । उद्बोधन या करीं ॥
कृपाकटाक्षें पुन्हां चढूं दे । वैभवशिखरावरी ॥ ४ ॥

रोमरंध्रिं चैतन्य खेळवी । राष्ट्राच्या ईश्वरा ॥
सात समुद्रांवरी फडकुं दे । यशोध्वजा सुंदरा ॥ ५ ॥

---

## २२. भारतभूमीस वंदन

### । वन्दे मातरम् ।




वन्दे मातरम् ।
सुजलाम् सुफलाम् मलयजशीतलाम्
सस्यशामलाम् । मातरम् ॥ वन्दे ॥ १ ॥
शुभ्रज्योत्स्नां पुलकितयामिनीम् ।
फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीम् ।
सुहासिनीम् सुमधुरभाषिणीम् ।
सुखदां वरदां । मातरम् ॥ वन्दे ॥ २ ॥
सप्तकोटि कंठ कलकल निनादकराले ।
द्विसप्तकोटिभुजैर्धृतखरकरवाले ।
के बोले मा तुमि अबले ।
बहुबलधारिणीम् । नमामि तारिणीम् ।
रिपुदलवारिणीम् । मातरम् ॥ ३ ॥
तुमि विद्या तुमि धर्म । तुमि हृदि तुमि मर्म ।
बाहु ते तुमि मा शक्ति ।
हृदये तुमि मा भक्ति ।
तोमारइ प्रतिमा गडि मंदिरे । मातरम् ॥ वन्दे ॥ ४ ॥

त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी ।
कमला कमलदलविहारिणी ।
वाणी विद्यादायिनी ।
नमामि त्वां नमामि कमलाम् ।
अमलां अतुलां । मातरम् ॥ वन्दे ॥ ५ ॥
श्यामलां सुस्मितां भूषिताम्
धरणीम् । भरणीम् मातरम् । वन्दे ॥ ६ ॥

—बंकिमचन्द्र चतर्जी

८७२२

---

## २३. स्वतंत्रतेचें स्तोत्र

जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे ।
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥ धृ०॥
राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति संपदांची ।
स्वतंत्रते भगवति ! श्रीमती राज्ञी तूं त्यांची ॥
परवशतेच्या नभांत तूंची आकाशीं होशी ।
स्वतंत्रते भगवति ! चांदणी चमचम लखलखशी ॥
गालावरच्या कुसुमीं किंवा कुसुमांच्या गालीं ।
स्वतंत्रते भगवति ! तूंच जी विलसतसे लाली ॥
तूं सूर्याचें तेज उदधिचें गांभीर्यहि तूंची ।
स्वतंत्रते भगवति ! अन्यथा ग्रहण नष्ट तेंची ॥
मोक्ष मुक्ति हीं तुझींच रूपें तुलाच वेदांती ।
स्वतंत्रते भगवति ! योगीजन परब्रह्म वदती ॥
जें जें उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर तें तें ।
स्वतंत्रते भगवति ! सर्व तव सहचारी होतें ॥

हें अधम-रक्त-रंजिते । सुजन-पूजिते । श्रीस्वतंत्रते ।
तुजसाठिं मरण तें जनन ।
तुजवीण जनन तें मरण ।
तुज सकल चराचर शरण ।
भरतभूमिला दृढालिंगना कधिं देशिल वरदे ।
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥

—स्वातंत्र्यवीर सावरकर

---

## २४. विद्यार्थ्यांची प्रार्थना



नमस्ते प्रभो विघ्नहर्त्रे श्रुताब्धे ।
कलानां निधे बुद्धिमात्रे सुबुद्धे ॥
वयं ज्ञानविज्ञानलाभाभिलाषात् ।
गृहीतव्रतास्त्वत्पदं संश्रयामः ॥ १ ॥

सदा सूनृता भारती शर्मदात्री । क्रियात् सान्निधिं सन्निधिं नो मुखाब्जे ॥
नरो यत्कृपापाङ्गतो मानपत्रं । भवत्याशु सर्वावनीमण्डलेऽस्मिन् ॥ २ ॥

गुरूपासनं ज्ञानदं मुख्यमेकं । मतं साधनं शिष्यवृंदस्य लोके ॥
अहो रामकृष्णादयो लोकनाथा । वसिष्ठादिकानाश्रयन् शिष्यवृत्त्या ॥ ३ ॥

स्वधर्म-स्वदेश-स्वभाषाभिमानो । न येषां ध्रुवं निष्फलं जन्म तेषाम् ॥
वयं जन्मसाफल्यमाशंसमाना । दृढं स्वाभिमानव्रतं पालयेम ॥ ४ ॥

नरः शीलवान् देशभक्तोऽति दक्षो । यतो जानते शिक्षणं तत्प्रदेयम् ॥
यदि प्राप्यते नैव शीलादिमत्त्वं । न तच्छिक्षणं शिक्षणाभास एव ॥ ५ ॥

विना शिक्षणं यौवनं माऽपयातु । महत्त्वं यतः शिक्षणापेक्षमेव ॥
अतः कार्यमन्यद्विहायाप्रमत्ताः । सुविद्यार्जने बद्धभावा भवामः ॥ ६ ॥

मुदास्मत्सुखार्थे विमुच्यात्मसौख्यं । पिताऽम्बा तथाचार्यवर्गश्च दक्षः ॥
अहोरात्रमात्मानमायानयन्ति । कृतज्ञा वयं तच्छिवं चिन्तयामः ॥ ७ ॥

सहैवा वसन्तः समं भोगभाजः । समं पौरुषं दर्शयन्तः स्वधीताः ॥
स्थिराङ्गाः शुभं सर्वतः प्राप्नुवन्तो । नयेमेशदत्तं सुखं दीर्घमायुः ॥ ८ ॥

—ग. पां. लोंढेशास्त्री

---

## २५. ज्ञानेश्वरीमधून



आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ॥
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १ ॥

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ॥
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचें ॥ २ ॥

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ॥
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥

वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ॥
अनवरत भूमंडळीं । भेटतु भूतां ॥ ४ ॥

चला कल्पतरूंचें अरव । चेतना चिंतामणीचें गांव ॥
बोलते जे अर्णव । पीयूषांचें ॥ ५ ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ॥
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ॥
भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥ ७ ॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इये ॥
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ॥ ८ ॥

तेथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो । हें होईल दानपसावो ॥
येणें बरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥ ९ ॥

—श्रीज्ञानेश्वर

## २६. ॥ भीमरूपी स्तोत्र ॥



भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती ।
वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना ॥ १ ॥
महाबळी प्राणदाता सकळां ऊठवी बळें ।
सौख्यकारी दुःखहारी धूर्त वैष्णव गायका ॥ २ ॥
दिनानाथा हरीरूपा सुंदरा जगदांतरा ।
पाताल देवताहंता भव्यसिंदूरलेपना ॥ ३ ॥
लोकनाथा जगन्नाथा प्राणनाथा पुरातना ।
पुण्यवंता पुण्यशीला पावना परितोषका ॥ ४ ॥
ध्वजांगें ऊचली बाहो आवेशें लोटला पुढें ।
कालाग्नि कालरुद्राग्नि देखतां कांपती भयें ॥ ५ ॥
ब्रह्मांडें माइली नेणों आवळें दंतपंगती ।
नेत्राग्नीं चालिल्या ज्वाळा भ्रुकुटी ताठिल्या बळें ॥ ६ ॥
पुच्छ तें मुर्डिलें माथां किरीटीं कुंडलें बरीं ।
सुवर्ण कटि कांसोटी 'घंटा' किंकिणि नागरा ॥ ७ ॥

ठकारे पर्वता ऐसा नेटका सडपातळ।
चपळांग पाहतां मोठें महाविद्युल्लतेपरी ॥ ८ ॥
कोटिच्या कोटि उड्डाणें झेंपावें उत्तरेकडे ।
मंदाद्रिसारखा द्रोणू क्रोधें उत्पाटिला बळें ॥ ९ ॥
आणिला मागुता नेला आला गेला मनोगती ।
मनासी टाकिलें मागें गतीसी तुळणा नसे ॥ १० ॥
अणूपासोनि ब्रह्मांडाएवढा होत जातसे ।
तयासी तुळणा कोठें मेरुमंदार धाकुटे ॥ ११ ॥
ब्रह्मांडाभोंवतीं वेढे वज्रपुच्छें करूं शके ।
तयासी तुळणा कैंची ब्रह्मांडीं पाहतां नसे ॥ १२ ॥
आरक्त देखिलें डोळां ग्रासिलें सूर्यमंडळा ।
वाढतां वाढतां वाढे भेदिलें शून्य मंडळा ॥ १३ ॥
धनधान्य पशूवृद्धि पुत्रपौत्र समस्तही ।
पावती रूपविद्यादि स्तोत्रपाठें करूनियां ॥ १४ ॥
भूतप्रेतसमंधादि रोगव्याधि समस्तही ।
नासती तूटती चिंता आनंदें भीमदर्शनें ॥ १५ ॥
ऐसें हें स्तोत्रमाहात्म्य पठती जपती सदा ।
मारुतीच्या प्रसादानें भुक्ति मुक्ति सदा वसे ॥ १६ ॥
हे धरा पंधरा श्लोकीं लाभली शोभली भली ।
दृढ देहो नि संदेहो संख्या चंद्रकळा गुणें ॥ १७ ॥
रामदासीं अग्रगण्य कपि कूळासि मंडण ।
रामरूपी अंतरात्मा दर्शनें दोष नासती ॥ १८ ॥

॥ इति श्रीरामदासकृत-संकटनिरसनं मारुतीस्तोत्रमाहात्म्यं संपूर्णम् ॥

—रामदास.

## २७. ॥ श्रीरामरक्षा–स्तोत्रसार ॥

रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे ।
रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः ॥
रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहं ।
रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राममामुद्धर ॥ १ ॥

श्रीराम राम रघुनंदन राम राम । श्रीराम राम भरताग्रज रामराम ॥
श्रीराम राम रणकर्कश राम राम । श्रीराम राम शरणं भव रामराम ॥२॥

श्रीरामचंद्रचरणौ मनसा स्मरामि । श्रीरामचंद्रचरणौ वचसा गृणामि ॥
श्रीरामचंद्रचरणौ शिरसा नमामि । श्रीरामचंद्रचरणौ शरणं प्रपद्ये ॥३॥



माता रामो मत्पिता रामचंद्रः । स्वामी रामो मत्सखा रामचंद्रः ॥
सर्वस्वं मे रामचंद्रो दयालुः । नान्यं जाने नैव जाने न जाने ॥ ४ ॥
राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे । सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने
॥ इति श्रीबुधकौशिकविरचितं श्रीरामरक्षास्तोत्रसारं संपूर्णम् ॥

## करुणाष्टकें

अनुदिन अनुतापें तापलों रामराया ।
परम दिनदयाळा ! नीरसीं मोहमाया ॥
अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥ १ ॥
भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजनजनधनाचा वेर्थ म्यां स्वार्थ केला ॥
रघुपति ! मति माझी आपुलीशी करावी ।
सकळ त्यजुनि भावें कांस तूझी धरावी ॥ २ ॥
तनुमनधन माझें राघवा ! रूप तूझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें ॥
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचळ भजन लीळा लागली आस तूझी ॥ ३ ॥
चपळपण मनाचें मोडितां मोडवेना ।
सकळ स्वजन माया तोडितां तोडवेना ॥
घडिघडि विघडे हा निश्चयो अंतरींचा ।
म्हणउनि करुणा हे बोलतों दीनवाचा ॥ ४ ॥
जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं ॥
तळमळ निववीं रे राम कारुण्यसिंधू ।
षडरिपुकुळ माझें तोडिं याचा समंधू ॥ ५ ॥

तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
सिणत सिणत पोटीं पाहिली वाट तूझी ॥
झडकरि झड घालीं धांव पंचानना रे ।
तुंजविण मज नेती जंबुकी वासना रे ॥ ६ ॥
स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ॥
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि जाती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥ ७ ॥
उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं ।
सकलजनविरामीं रामविश्रामधामीं ॥
घडि घडि मन आतां रामरूपीं भरावें ।
रविकुळटिळका रे ! आपुलेंसें करावें ॥ ८ ॥

## २८. ॥ श्रीमद्भगवद्गीतासार ॥

वासांसि जीर्णानि यथा विहाय । नवानि गृह्णाति नरोऽपराणि ॥
तथा शरीराणि विहाय जीर्णा-। न्यन्यानि संयाति नवानि देही ॥१॥
नैनं छिन्दन्ति शस्त्राणि । नैनं दहति पावकः ॥
न चैनं क्लेदयन्त्यापो । न शोषयति मारुतः ॥ २ ॥



जातस्य हि ध्रुवो मृत्यु : ध्रुवं जन्म मृतस्य च ॥
तस्मादपरिहार्येऽर्थे । न त्वं शोचितुमर्हसि ॥ ३ ॥
नेहाभिक्रमनाशोऽस्ति । प्रत्यवायो न विद्यते ॥
स्वल्पमप्यस्य धर्मस्य । त्रायते महतो भयात् ॥ ४ ॥
कर्मण्येवाधिकारस्ते । मा फलेषु कदाचन ॥
मा कर्मफलहेतुर्भू । र्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ ५ ॥

ध्यायतो विषयान्पुंसः । संगस्तेषूपजायते ॥
संगात् संजायेत कामः । कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६ ॥
क्रोधाद्भवति संमोहः । संमोहात्स्मृतिविभ्रमः ॥
स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशो । बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ७ ॥
प्रसादे सर्वदुःखानां । हानिरस्योपजायते ॥
प्रसन्नचेतसो ह्याशु । बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ८ ॥
या निशा सर्वभूतानां । तस्यां जागर्ति संयमी ॥
यस्यां जाग्रति भूतानि । सा निशा पश्यतो मुनेः ॥ ९ ॥
विहाय कामान् यः सर्वान् । पुंमांश्चरति निःस्पृहः ॥
निर्ममो निरहंकारः । स शांतिमधिगच्छति ॥ १० ॥
नियतं कुरु कर्म त्वं । कर्म ज्यायो ह्यकर्मणः ॥
शरीरयात्रापि च ते । न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ ११ ॥
अन्नाद्भवन्ति भूतानि । पर्जन्यादन्नसंभवः ॥
यज्ञाद्भवति पर्जन्यो । यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १२ ॥
तस्मादसक्तः सततं । कार्यं कर्म समाचार ॥
असक्तो ह्याचरन् कर्म । परमाप्नोति पूरुषः ॥ १३ ॥
यद्यदाचरति श्रेष्ठः । तत्तदेवेतरो जनः ।
स यत्प्रमाणं कुरुते । लोकस्तदनुवर्तते ॥ १४ ॥
न बुद्धिभेदं जनयेत् । अज्ञानां कर्मसंगिनाम् ॥
जोषयेत्सर्वकर्माणि । विद्वान् युक्तः समाचरन् ॥ १५ ॥
श्रेयान् स्वधर्मो विगुणः । परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥
स्वधर्मे निधनं श्रेयः । परधर्मो भयावहः ॥ १६ ॥
यदा यदा हि धर्मस्य । ग्लानिर्भवति भारत ॥
अभ्युत्थानमधर्मस्य । तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ॥ १७ ॥
परित्राणाय साधूनां । विनाशाय च दुष्कृताम् ॥
धर्मसंस्थापनार्थाय । संभवामि युगे युगे ॥ १८ ॥

ये यथा मां प्रपद्यन्ते । तांस्तथैव भजाम्यहम् ॥
मम वर्त्मानुवर्तन्ते । मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ १९ ॥
चातुर्वर्ण्यं मया सृष्टं । गुणकर्मविभागशः ॥
तस्य कर्तारमपि मां । विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥ २० ॥
न हि ज्ञानेन सदृशं । पवित्रमिह विद्यते ॥
तत्स्वयं योगसंसिद्धः । कालेनात्मनि विंदति ॥ २१ ॥
श्रद्धावाँल्लभति ज्ञानं । तत्परः संयतेंद्रियः ॥
ज्ञानं लब्ध्वा परां शांतिं । अचिरेणाधिगच्छति ॥ २२ ॥
विद्याविनयसंपन्ने । ब्राह्मणे गवि हस्तिनि ॥
शुनि चैव श्वपाके च । पंडिताः समदर्शिनः ॥ २३ ॥
उद्धरेदात्मनाऽऽत्मानं । नात्मानमवसादयेत् ॥
आत्मैव ह्यात्मनो बंधुः । आत्मैव रिपुरात्मनः ॥ २४ ॥
यत्करोषि यदश्नासि । यज्जुहोषि ददासि यत् ॥
यत्तपस्यसि कौन्तेय । तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २५ ॥

### श्रीविठ्ठलमहिमा

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनीयां ॥ १ ॥
गळां तुळसीहार कांसे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥
मकर कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणी विराजित ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

---

## २९. देवादिकांच्या आरत्या

### आरती गणपतीची

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नांची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ॥



सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची।
कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥ १ ॥
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती।
दर्शनमात्रें मनःकामना पुरती ॥ धृ० ॥
रत्नखाचित फरा तुज गौरीकुमरा।
चंदनाची ऊटी कुंकुम केशरा।
हिरेजडित मुगुट शोभतो बरा।
रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ॥ २ ॥
लंबोदर पीतांबर फणिवरबंधना।
सरळ सोंड वक्रतुंड त्रीनयना ॥
दास रामाचा वाट पाहे सदना।
संकटीं पावावें, निर्वाणीं रक्षावें, सुरवरवंदना ॥ ३ ॥
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती।
दर्शनमात्रें मनःकामना पुरती ॥ धृ० ॥

## ॥ अथ गणेशाथर्वशीर्ष व्याख्यास्यामः ॥

ॐ नमस्ते गणपतये। त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमासि॥ त्वमेव केवलं कर्तासि। त्वमेव केवलं धर्तासि॥ त्वमेव केवलं हर्तासि। त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि॥ त्वं साक्षादात्मासि नित्यं ॥ १ ॥ ऋतं वच्मि। सत्यं वच्मि॥ २ ॥ अव त्वं मां। अव वक्तारं ॥ अव श्रोतारं। अव दातारं॥ अव धातारं। अवानूचानमव शिष्यं॥ अव पश्चात्तात्। अव पुरस्तात्॥ अवोत्तरात्तात्। अव दक्षिणात्तात्॥ अव चोर्ध्वात्तात् अवाधरात्तात्। सर्वतो मां पाहि पाहि समंतात्॥३॥ त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः। त्वमानंदमयस्त्वं ब्रह्ममयः॥ त्वं सच्चिदानंदाद्वितीयोऽसि। वं प्रत्यक्षं ब्रह्मासि॥ त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि॥४॥ सर्वं जगदिदं त्वत्तो जायते। सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति॥ सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति। सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति॥ त्वं भूमिरापोनलोनिलो नभः। त्वं चत्वारि वाक्पदानि॥५॥

त्वं गुणत्रयातीतः । त्वं देहत्रयातीतः ।। त्वं कालत्रयातीतः । त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यं ।। त्वं शक्तित्रयात्मकः ।। त्वां योगिनो ध्यायन्ति नित्यं ।। त्वं ब्रह्मास्त्वं विष्णुस्तं रुद्रस्त्वमिंद्रस्त्वमाग्निस्त्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम् ।। ६ ।। गणादिं पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनंतरं ।। अनुस्वारः परतरः ।। अर्धेंदुलसितं ।। तारेण रुद्धं ।। एतत्तव मनुस्वरूपं ।। गकारः पूर्वरूपं ।। अकारो मध्यमरूपं ।। अनुस्वारश्चांत्यरूपं ।। बिंदुरुत्तररूपं ।। नादः संधानं सꣳहिता संधिः ।। सैषा गणेशाविद्या ।। गणक ऋषिः ।। निचृद्गायत्री छंदः गणपतिर्देवता ।। ॐ गं गणपतये नमः ।। ७ ।। एकदंताय विद्महे वक्रतुंडाय धीमहि । तन्नो दंती प्रचोदयात् ।।८।। एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम् ।। रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम् ।। रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससं ।। रक्तगंधानुलिप्तांगं रक्तपुष्पैः सुपूजितम् ।। भक्तानुकंपिनं देवं जगत्कारणमच्युतं ।। आविर्भूतं च सृष्टयादौ प्रकृतेः पुरुषात्परं ।। एवं ध्यायति यो नित्यं न योगी योगिनांवरः ।।९।। नमो व्रातपतये नमो गणपतये नमः । प्रमथपतये नमस्ते । अस्तु लंबोदरायैकदंताय विघ्ननाशिने शिवसुताय श्रीवरदमूर्तये नमः ।।१०।।

## आरती श्रीरामचंद्राची

श्रीराम जयराम जय जय राम ।
आरती ओवाळूं पाहूं सुंदर मेघश्याम ।। धृ० ।।
ठकाराचें ठाण करीं धनुष्यबाण ।
मारुती सन्मुख पुढें उभा कर जोडून ।। १ ।।
रत्नजडित माणिक वर्णूं काय मुगुटीं ।
आरती ओवाळूं पाहूं चौदा भुवनांचे पोटीं ।। २ ।।
भरत शत्रुघ्न दोघेजण चामर ढाळिती ।
स्वर्गांतूनि देव पुष्पवृष्टि करिती ।। ३ ।।
विष्णुदास नामा म्हणे माग तूं तें ।
आरती ओवाळूं पाहूं सीतापतीतें ।। ४ ।।

## आरती मारुतीची



सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं ।
करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं ॥
कडाडिलें ब्रह्मांड धोका त्रिभुवनीं ।
सुरवर नर नीशाचर त्या झाल्या पळणीं ॥१॥
जयदेव जयदेव जय हनूमंता ।
तुमचेनि प्रतापें न भिये कृतान्ता ॥ धृ० ॥

दुमदुमलें पाताळ उठिला प्रतिशब्द ।
धगधगिला धरणीधर मानीला खेद ॥
कडाडिले पर्वत उडुगण उच्छेद ।
रामीरामदासा शक्तीचा शोध ॥ २ ॥
जयदेव जयदेव जय हनूमंता ।
तुमचेनी प्रतापें न भिये कृतान्ता ॥ धृ० ॥

## आरती देवीची

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं ।
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं ॥
वारीं वारीं जन्म-मरणातें वारीं ।
हारीं पडलों आतां संकट नीवारीं ॥ १ ॥
जयदेवी जयदेयी जय महिषासुरमथिनी ।
सुरवर ईश्वर वरदे तारक संजिवनी ॥ धृ० ॥
त्रिभुवन भुवनीं पाहतां तुज ऐसे नाहीं ।
चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं ।

साही विवाद करितां पडले प्रवाहीं ।
ते तूं भक्तालागीं पावसि लवलाहीं ॥ २ ॥
प्रसन्नवदनें प्रसन्न होसी निजदासां ।
क्लेशापासुनि सोडविं तोडीं भवपाशा ॥
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा ।
नरहरि तल्लिन झाला पदपंकज लेशा ॥ ३ ॥
जयदेवी जयदेवी जय महिषासुरमथिनी ।
सुरवर ईश्वर वरदे तारकसंजिवनी ॥ धृ० ॥

## आरती तुळशीची

जयदेवी जयदेवी जय माये तुळशी ।
निजपत्राहूनि लघुतर त्रिभुवन हे तुळशी ॥ जय० ॥
ब्रह्मा केवळ मूळीं मध्यें तो शौरी ।
अग्रीं शंकर तीर्थें शाखा परिवारीं ।
सेवा करिती भावें सकळहि नरनारी ।
दर्शनमात्रें पापें हरती निर्धारीं ॥ जय० ॥ १ ॥
शीतळ छाया भूतळ व्यापक तूं कैसी ।
मंजरिची बहु आवड कमळारमणासी ॥
तव दलविरहित विष्णू राहे उपवासी ।
विशेष महिमा तूझा शुभ कार्तिकमासीं ॥ जय० ॥ २ ॥
अच्युत माधव केशव पीतांबरधारी ।
तूझें पूजन काळीं जो हें उच्चारी ॥
त्यासी देशी संतति संपति सुखकारी ।
गोसावीसुत विनवी मजला तूं तारीं ॥ जय० ॥ ३ ॥

## आरती विठ्ठलाची



युगे अठ्ठावीस विटेवरी ऊभा ।
वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥
पुंडलिकाचे भेटीं परब्रह्म आलें गा ।
चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥
जयदेव जयदेव जय पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा, राईच्या वल्लभा, पावें जिवलगा ॥धृ०॥
तुळशीमाळा गळा कर ठेवुनि कटीं ।
कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं ॥
देव सुरवर नित्य येती भेटी ।
गरुड हनूमंत पुढें उभे रहाती ॥ २ ॥
धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ।
सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ।
राई रखुमाबाई राणीयां सकळा ।
ओंवाळीती राजा विठोबा सांवळां ॥ ३ ॥
ओवाळूं आरत्या कुरवंड्या येती ।
चंद्रभागेमाजीं सोडुनियां देती ॥
दिंड्यापताका वैष्णव नाचती ।
पंढरीचा महिमा वर्णावा कीती ॥ ४ ॥
आषाढीं कार्तीकीं भक्तजन येती ।
चंद्रभागेमाजीं स्नानें जे करिती ॥
दर्शन हेळामात्रें तया होय मुक्ती ।
केशवासी नामदेव भावें ओवाळीती ॥ ५ ॥
जयदेव जयदेव जय पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा, राईच्या वल्लभा, पावें जिवलगा
जयदेव जयदेव ॥ धृ० ॥



## आरती दत्ताची

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।
त्रीगूणी अवतार त्रैलोक्य राणा ॥
नेति नेति शब्द न ये अनुमाना ।
सुरवर मुनिजन योगी ध्याती चव चरणा ॥ १ ॥
जयदेव जयदेव जय श्रीगुरुदत्ता। आरति ओवाळीतां हरती भवाचिंता ॥
जयदेव जयदेव ॥

सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त ।
अभाग्यासी कैसी न कळे ही मात ॥
पराही परतली कैंचा हा हेत ।
जन्ममरणाचा पुरवीला अंत ॥ २ ॥ जयदेव जयदेव ॥
दत्त येऊनीयां ऊभा ठाकला ।
साष्टांग नमनें प्रणिपात केला ॥
प्रसन्न होऊनी आशिर्वाद दिधला ।
जन्ममरणाचा फेरा चुकवीला ॥ ३ ॥ जयदेव जयदेव ॥
दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान ।
हारपलें मन झालें उन्मन ॥
मी-तूं-पणाची झाली ओसण ।
एकाजनार्दनीं श्रीदत्त ध्यान ॥ ४ ॥ जयदेव जयदेव ॥

## श्रीगुरुपादुकाष्टक

ज्या संगतीनेंच वीराग झाला । मनोदरींचा जड भाग गेला ॥
साक्षात् परात्मा मज भेटवीला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥१॥
सद्योगपंथें घरिं आणियेलें । अंगेंच मातें परब्रह्म केलें ॥
प्रचंड तो बोधरवी उदेला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥ २ ॥
चराचरीं व्यापकता जयाची । अखंड भेटी मजला तयाची ।
परंपदीं संगम पूर्ण झाला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥ ३ ॥

जो सर्वदा गुप्त जनांत वागे । प्रसन्न भक्तां निजबोध सांगे ।
सद्भक्तिभावाकरितां भुकेला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥४॥
कांहीं मला सेवनही न झालें । तथापि तेणें मज उद्धरीलें ॥
आतां तरी अर्पिन प्राण त्याला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥५॥
अनंत माझे अपराध कोटी । नाणीं मनीं घालुनि सर्व पोटीं ॥
प्रबोध करितां श्रम फार झाला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥६॥
माझा अहंभाव असे शरीरीं । तथापि तो सद्गुरु अंगिकारी ॥
नाहीं मनीं अल्प विकार ज्याला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥७॥
आतां कसा मी उपकार फेडूं । हा देह ओवाळुनि दूर सांडूं ॥
म्यां एक भावें प्रणिपात केला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥८॥
जया वर्णितां वर्णितां वेदवाणी । म्हणे नेति नेतीति लाजे दुरूनी ॥
नव्हे अंत ना पार ज्याच्या रुपाला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥९॥
जो साधुचा अंकित जीव झाला । त्याचा असे भार निरंजनाला ।
नारायणाचा भ्रम दूर केला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥ १० ॥

## आरती गीतेची

जयदेवी जयदेवी जय भगवद्गीते ।
आरती ओवाळूं तुज वेदमाते ॥ धृ० ॥
सुखकरणी दुखहरणी जननी वेदांची ।
अगाध तूझा महिमा नेणें वीरिंची ॥
ते तूं ब्रह्मीं तल्लिन होसी ठायींची ।
अर्जूनाचे भावें प्रगटे मूर्खीची ॥ १ ॥ जयदेवी जयदेवी ॥
सात शतें श्लोक व्यासोक्तीसार ।
अष्टादशाध्याय इतुका विस्तार ॥
एक अर्थ पाद करितां उच्चार ।
स्मरणमात्रें त्याचा निरसे संसार ॥२॥ जयदेवी जयदेवी ॥

काय तुझा पार वर्णू मी दीन ।
अनन्य भावें तुजला आलों मी शरण ॥
सनाथ करीं मातें कृपा करून ।
बाप रखुमादेवी वरदासमान ॥३॥ जयदेवी जयदेवी ॥

## आरती मंगलागौरीची

जय माये मंगलागौरी । तुजला पूजूं अंतरीं ॥
नानाविध उपचारीं । दीप ओवाळूं सुंदरी ॥ जय० ॥
मंगलागौरी नाम तूझें । तुला नमन असो माझें ॥
भवदुःखाचें हें ओझें । देवी ऊतरावें सहजें ॥ ॥ जय० ॥
गजाननाची तूं माता ॥ शंकराची प्रीयकांता ॥
हिमाचलाची तूं दुहिता । मज तारीं तारीं आतां ॥ जय० ॥
लागे तूझ्या चरणाशीं । जाळीं पापाचीया राशी ॥
भक्ती ठसावी मानसीं । अंबे, न्यावें पायांपाशीं ॥ जय० ॥
गौरी ओवाळीत्यें दीप । नेणें तुझें नामरूप ॥
वाढवावें भाग्य अमूप । विश्वाची तूं मायबाप ॥ जय० ॥
रिकामी ही खटपट । शुद्ध मार्गी लावीं नीट ॥
परब्रह्म घनदाट । द्यावी नारायणी भेट ॥ जय० ॥

---

## आरतीनंतर

घालीन लोटांगण वंदीन चरण, डोळ्यांनीं पाहीन रूप तुझें ।
प्रेमें आलिंगीन आनंदें पूजीन, भावें ओवाळीन म्हणे नामा ॥ १ ॥
त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्वं मयि देव देव ॥ २ ॥

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् ।
करोमि यद्यत् सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि ॥ ३ ॥
अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं हरिं ।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥ ४ ॥
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥ ५ ॥

॥ मंगलमूर्ती मोरया ॥

## ॥ मंत्रपुष्पांजलिः ॥

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्। ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ॥ ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने नमो वयं वै श्रवणाय कुर्महे । समे कामान् कामकामाय मह्यं। कामेश्वरो वै श्रवणो ददातु। कुबेराज वै श्रवणाय महाराजाय नमः । ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्य-माधिपत्यमयं समंतपर्याई स्यात् । सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात्। पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति । तदप्येषः श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे । आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ॥

---

# ३०. श्री समर्थ रामदासस्वामी कृत

## श्रीशिवराय प्रशस्ति



शिवरायाचें आठवावें रूप ।
शिवरायाचा आठवावा प्रताप ॥
शिवरायाचा आठवावा साक्षेप ।
भूमंडळीं ॥ १ ॥

नों. दि.

निश्चयाचा महामेरु । बहुतजनांसी आधारु ॥
अखंड स्थितीचा निर्धारु ॥ श्रीमंत योगी ॥ २ ॥

परोपकाराचिया राशी ॥ उदंड घडती जयासी ॥
तयाचे गुण महत्त्वासी ॥ तुळणा कैंची ॥ ३ ॥

नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जळपति ॥
पुरंदर आणि छत्रपति ॥ शक्ति पृष्ठभागीं ॥ ४ ॥

यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ॥
पुण्यवंत नीतिवंत ॥ जाणता राजा ॥ ५ ॥

आचारशीळ विचारशीळ । दानशीळ धर्मशीळ ॥
सर्वज्ञपणें सुशीळ ॥ सकलां ठायीं ॥ ६ ॥

धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर ॥
सावधपणें नृपवर ॥ तुच्छ केलें ॥ ७ ॥

तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ॥
सकळ पृथ्वी आंदोळली ॥ धर्म गेला ॥ ८ ॥

देव धर्म गो-ब्राह्मण । करावया संरक्षण ॥
हृदयस्थ झाला नारायण ॥ प्रेरणा केली ॥ ९ ॥

उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ॥
धूर्त तार्किक सभानायक ॥ तुमच्या ठायीं ॥ १० ॥

या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ॥
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं ॥ तुम्हांकरितां ॥ ११ ॥

आणीकहि धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊनि कित्येक राहती ॥
धन्य धन्य तुमची कीर्ती ॥ विश्वीं विस्तारली ॥ १२ ॥

कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ॥
कित्येकांस आश्रय झाले ॥ शिवकल्याण राजा ॥ १३ ॥

## ३१. उपदेशपर फटका

बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडुं नको ॥
संसारामधिं ऐस आपला उगाच भटकत फिरूं नको ॥
चल सालसपण धरुनि निखालस बोला खोट्या बोलुं नको ॥
अंगिं नम्रता सदा असावी राग कुणावर धरूं नको ॥
नास्तिकपणांत शिरुनि जनाचा बोल आपणा घेउं नको ॥
भली भलाई कर कांहीं पण अधर्ममार्गीं शिरूं नको ॥
मायबापांवर रुसूं नको । दूर एकला बसूं नको ॥
व्यवहारामधें फसूं नको । कधीं रिकामा असूं नको ॥
परी उलाढाली भलभलत्या पोटासाठीं करूं नको ॥ १ ॥
वर्म काढुनी शरमायाला उणें कुणाला बोलुं नको ॥
बुडवाया दुसऱ्याचा ठेवा करुनी हेवा झटूं नको ॥
मी मोठा शाहणा धनाढ्यहि गर्वभार हा वाहुं नको ॥
एकाहुन एक चढी जगामधिं थोरपणाला मिरवुं नको ॥
हिमायतीच्या बळें गरिबगुरिबांला तूं गुरकावुं नको ॥
दो दिवसांची जाइल सत्ता अपेश माथां घेउं नको ॥
बहुत कर्जबाजारी होउनि बोज आपला दवडुं नको ॥
स्नेह्यांसाठीं पदरमोड कर परंतु जामिन होउं नको ॥
विडा पैजेचा उचलुं नको । उणी तराजू तोलुं नको ॥
गहाण कुणाचें डुलवुं नको । असल्यावर भिक मागुं नको ॥
नसल्यावर सांगणें कशाला गाव तुझा भिड धरूं नको ॥ २ ॥

उगीच निंदा स्तुती कुणाची स्वहितासाठीं करूं नको ॥
बरी खुशामत शहाण्याची ही मूर्खाची ती मैत्रि नको ॥
कष्टाची बरि भाजि भाकरी तूप-साकरेचि चोरि नको ॥
आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढती पाहुं नको ॥
दिली स्थिती देवानें तींतच मानी सुख कधिं विटूं नको ॥
असल्या गांठीं धन संचय कर सत्कार्यीं व्यय हटूं नको ॥
आतां तुजही गोष्ट सांगतों सत्कर्मा ओसरूं नको ॥
सत्कीर्ती-नौबदिचा डंका गाजे मग शंकाच नको ॥
सुविचारा कातरूं नको । सत्संगति अंतरूं नको ॥
द्वैताला अनुसरूं नको । हरि-भजना विस्मरूं नको ॥
गावयास अनंतफंदीचे फटके मागें सरूं नको ॥ ३ ॥

---

## राष्ट्रगीत

जनगणमन अधिनायक जय हे
भारत भाग्य वि
पंजाब मध्य गुजरात मराठा
द्राविड उत्कल वंगा
विंध्य हिमाचल जमुना गंगा
उच्छल जलधि तरंगा
तव शुभ नामे जागे । तव शुभ आशिस मागे
गाहे तव यश गाथा । जय हे ! जय हे ! ! जय हे ! ! !
जय जय जय जय हे !

REFBK-0008722

मूल्य सहा आणे

★